# - गीतारहस्य -

(१) अगदी रोज सकाळी आपण वर्तमानपत्राची आतुरतेने वाट बघत असतो परंतु तेच संध्याकाळी शिळे होऊन जाते. नियमितपणे निघणारी मासिके काही महिन्यांनी रद्दीत जातात. काही कथा, कादंबऱ्या, लेख आपण पुन्हा पुन्हा वाचतो परंतु काळाचे संदर्भ बदलले की पुढच्या पिढीला ते फारसे रुचत नाहीत. असे साहित्यही नजरेआड जाते. हां, प्रवासवर्णने, चरित्र मात्र अनेक वर्षे रसिकांच्या वाचनात राहतात. मात्र काही ग्रंथ मात्र अजरामरच होऊन राहतात. खऱ्या अर्थाने त्यांना अक्षर वाङ्मय म्हणावे लागेल.

शतक उलटले तरी असे साहित्य आवर्जून विकत घेतले जाते, वाचले जाते. त्यावर चर्चा, परिसंवाद होतात. व्याख्यानमाला आयोजित केल्या जातात. श्रोते लक्षपूर्वक ऐकून त्यावर अभ्यास करतात. असे भाग्य लाभलेला एक अनमोल ग्रंथ म्हणजे "गीतारहस्य"! होय, लो. बाळ गंगाधर टिळकांनी मंडाले येथील तुरुंगात लिहिलेला ग्रंथ - गीतारहस्य. या ग्रंथाचे हे शंभरावे वर्ष आहे. १९१४-१५ हे ग्रंथशताब्दीचे वर्ष आहे.

• या गीतारहस्याची पहिली ओळख होते ती शालेय जीवनात! मंडालेच्या तुरुंगात असताना लो. टिळकांनी कोणता ग्रंथ लिहिला या प्रश्नाला पूर्ण गुण मिळवून देणारे उत्तर म्हणजे गीतारहस्य! ही गोष्ट सर्वांनाच ठाऊक आहे. परंतु त्या ग्रंथलेखनाच्या मागील अडचणींचा प्रवास सर्वांना माहीत नाही. असंख्य अडचणींवर मात करत हा ग्रंथ पूर्ण झाला आहे.

सोमवार ८ जून १९१४ या दिवशी लो. टिळकांची मंडालेच्या तुरुंगातून सुटका झाली. मात्र मंडालेचा तुरुंग सोडण्यापूर्वी आपल्या इतर सामानाबरोबरच हस्तलिखिताच्या वह्या लोकमान्यांनी तिथल्या अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केल्या होत्या. पुण्याला येऊन काही आठवडे लोटले तरी सरकारकडून त्या वह्या परत मिळण्याची चिन्हे दिसेनात. तेव्हा आजूबाजूचे परिचित लोक साशंक झाले. वह्या परत मिळेनात म्हणून कष्टी झाले. परंतु लो. टिळकांची जिद्द, कणखरपणा, धैर्य व स्मरणशक्ती इतकी विलक्षण होती की ते म्हणायचे - "वह्या सरकारच्या ताब्यात असल्या तरी ग्रंथ माझ्या डोक्यात आहे. फुरसतीच्या वेळी सिंहगडावर बसून जशाच्या तसा लिहून काढीन. भिण्याचे

©www.madhaveeraghuveer.com

"कारण नाही." केवढा हा आत्मविश्वास! आणि ही तेजस्वी भाषा एखाद्या तरुणाची नाही तर साठी ओलांडलेल्या वयस्कर गृहस्थाची आहे आणि ग्रंथ देखील साधासुधा, हलकाफुलका नाही तर गहन तत्वज्ञानविषयक आहे हे लक्षात घेतल्यावर तर, त्यांच्याबद्दलचा आदर अधिकच दुणावतो. एवढ्या एकाच प्रसंगावरुन त्यांच्या प्रवृत्तिपर प्रयत्नवादाची यथार्थ कल्पना येऊ शकते. सुदैवाने लवकरच सरकारकडून त्या सर्व वह्या सुरक्षित मिळाल्या. व लोकमान्यांच्या हयातीतच या ग्रंथाच्या तीन आवृत्त्या निघाल्या. पुनश्च हरि ॐ - केसरीतील अग्रलेख

② **समाजाच्या** धारणेसाठी निर्माण झालेले टीकाग्रंथच समाजात टिकून राहतात. त्या वेळच्या निद्रिस्त समाजाला या ग्रंथाने नवसंजीवनी दिली. गीतेतील तत्वज्ञान हे सामान्य लोकांपासून फार दूर गेले होते. गीता हा निवृत्तिपर किंवा संन्यासमार्गाला लावणारा धर्मग्रंथ आहे अशा चुकीच्या समजुती लोकांच्या मनात होत्या. सांसारिक कर्मे गौण मानून समाजाकडे पाठ फिरवणारा तो ज्ञानी अशी ज्ञानाची विपरीत व्याख्या रुढ होऊ पाहत होती. अशा बिकट परिस्थितीत लोकमान्यांनी समाजबांधणीसाठी अधिकारवाणीने गीतेचा खरा अर्थ लोकांपर्यंत पोहोचवला. ज्ञानी माणसाने समाजाकडे पाठ फिरवून चालणारच नाही. उलट समाजात राहून समाजाला योग्य दिशा दाखवण्याचे सन्मार्गाला नेण्याचे फार मोठे काम ज्ञानी मनुष्य करतो. कर्माला पाठ दाखवणारा तो ज्ञानी नव्हेच. उलट ज्ञानी माणसाला तर कर्म सोडताच येत नाही. हा क्रांतिकारक विचार लोकमान्यांनी जनमानसात पेरला. या व अशा प्रवर्तक विचारांनी हिंदू समाजाला नवसंजीवनी देण्याचे लोकोत्तर काम लोकमान्यांनी धडाडीने केले. खरं पाहिलं तर 'गीतारहस्य' हे लो. टिळकांचे आत्मचरित्रच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आधी केले मग सांगितले. खऱ्या कर्मयोग्याचे जीवन ते जगले

आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करीत ज्या प्रकारचे तेजस्वी जीवन ते जगले त्याला केवळ असामान्यच म्हणावे लागेल. मंडालेच्या तुरुंगात असताना त्यांनी हा दिव्य ग्रंथ लिहिला एवढी त्रोटक माहिती आपल्याला असते. परंतु त्यामधील अडचणींची मालिका सर्वसामान्यांना ज्ञात नसते.

©www.madhaveeraghuveer.com

हे लिखाण करीत असताना संदर्भासाठी त्यांना काही ग्रंथ लागत असत. परंतु एका वेळी जास्तीत जास्त चारच ग्रंथ जवळ बाळगण्याची मुभा त्यांना होती. ग्रंथलेखनासाठी जे कागद त्यांना मिळत ते मोठ्या मिनतवारीने मिळत. कागद सुटे न देता बांधलेली बुके, आतील पाने मोजून, त्यावर पाठपोट असे आकडे घालून मिळत व लिहिण्याकरता शाई न देता फक्त शिसपेन्सिलीच देत व त्यादेखील टोक करून देत.

(3) हा एवढा मोठा ग्रंथ लिहायला साधारण साडेतीन ते चार महिन्यांचा कालावधी लागला. २ नोव्हेंबर १९१० मध्ये या हस्तलिखितास सुरुवात केली व मार्च १९११ मध्ये याचा कच्चा आराखडा पूर्ण झाला असावा. मात्र हे सर्व करत असताना चित्ताला स्वस्थता नव्हती. उलट परिस्थितीची अनिश्चितता फार भीषण होती. या तुरुंगातून आपण जिवंत सुटू की नाही याविषयी खात्री नव्हती. परंतु काहीही झाले तरी आपण परिश्रमपूर्वक मिळवलेले ज्ञान व त्यापासून सुचलेले विचार हे व्यर्थ जाऊ नयेत अशी तळमळ त्यांना वाटत होती. त्यासाठी कोणत्या मजकुरापुढे कोणता मजकूर घ्यायचा, यासंबंधी सूचना त्यांनी आकडे घालून केलेल्या आढळतात. इतकेच नाही तर पुस्तकाची अनुक्रमणिका व अर्पणपत्रिका व प्रस्तावना यादेखील त्यांनी तुरुंगातच लिहिल्या आहेत. अर्थात तुरुंगातून सुटल्यावर पुस्तक प्रकाशित करण्यापूर्वी प्रस्तावनेत थोडा बदल केला आहे. हा ग्रंथ लिहिण्यापूर्वी त्यांनी तुरुंगात ओरायन व आर्यांचे मूल वसतिस्थान हे ग्रंथही लिहिले होते.

लोकोत्तर पुरुषांचे सगळेच कार्य अद्भुत व विलक्षण असते. सामान्य माणसाच्या कल्पनेच्या आवाक्यात न येणारी अशी त्यांची कुशाग्र बुद्धी होती. सामान्य मनुष्य केवळ तुरुंगवास या शब्दाने सुद्धा चळाचळा कापू लागतो परंतु त्यांना जेव्हा मंडाले येथे तुरुंगवास अशी शिक्षा ठोठावण्यात आली तेव्हा त्यांचे चित्त क्षणभरसुद्धा विचलित झाले नाही. उलट तुरुंगात मला पुरेशी विश्रांती व स्वस्थता मिळेल असे त्यांचे उद्गार होते. आणि खरोखरच 'गीतारहस्य' या ग्रंथाचा मुहूर्त साधण्यासाठी हा दीर्घ तुरुंगवास लाभदायक ठरला. तुरुंगवास ही त्यांच्यासाठी आपत्ती न ठरता 'इष्टापत्ती' ठरली.

मोठ्या लोकांचे सगळेच थोर असते हे अगदी खरे आहे. सार्वजनिक कार्याचा व्याप सुटून ग्रंथ लेखनाला लागणारी स्वस्थता त्यांना मंडालेच्या तुरुंगात मिळाली. त्यांच्या लेखणीला एक वेगळीच धार प्राप्त झाली. आणि एकापाठोपाठ एक अशी सोळा अनमोल प्रकरणे त्यांच्या लेखणीतून कागदावर उतरू लागली.

(४) लोकमान्यांची भाषा अतिशय रोखठोक व सडेतोड आहे. संदिग्धपणा, गुळमुळीत भाषा त्यांच्या लेखणीला मानवतच नाही. त्यापूर्वी त्यांनी उपनिषदांचा सांगोपांग अभ्यास केला होता. अनेक प्रकारच्या विविध गीता त्यांनी वाचल्या होत्या. प्रत्यक्ष भगवद्गीतेचे मर्म समजून घेतले. त्यांच्या स्वभावानुसार त्यांना त्यातील कर्मयोग अधिक भावला. आणि म्हणूनच गीतारहस्याचे दुसरे नाव कर्मयोगशास्त्र असे आहे.

त्यांनी केवळ भारतीय ग्रंथांचाच आधार घेतला नाही तर अनेक पाश्चात्य तत्वज्ञानविषयक ग्रंथांचा तौलनिक अभ्यास केला. कान्ट, सॉक्रेटिस यासारख्या तत्ववेत्त्यांची मते विचारात घेतली. इंग्रज ग्रंथकार हॉब्स व फ्रेंच पंडित हेल्वेशियस यांनी प्रतिपादन केलेली विधाने सत्यतेच्या निकषावर पडताळून पाहिली. 'हॅम्लेट' सारख्या लोकप्रिय नाटकाचे दाखले देऊन आपल्या विधानाला पुष्टि देण्याचा समर्पक प्रयत्न ही केला. यातून त्यांचा विशाल व व्यापक दृष्टीकोन दिसून येतो. यातील काहींची मते त्यांना ग्राह्य वाटली तर काही मतांवर त्यांनी आक्षेप घेतले. परंतु यातील प्रत्येक प्रतिपादन हे साधार आहे. निराधार किंवा बिनबुडाच्या विधानांना त्यांच्या लेखात स्थान नाही हे निश्चित! त्यांनी प्रत्येक मताचा साधकबाधक विचार केलेला आहे. प्रत्येक तत्वज्ञानी विद्वानाचे मत विचारात घेऊन त्याची व्यवस्थित मांडणी करून, त्यातील त्रुटी शोधून नंतर ते विधान खोडून काढले आहे. आणि त्यानंतर विधायक विधान करून त्याच्या पुष्टिसाठी काही दाखले दिले आहेत. त्यामुळे प्रत्येक लेख हा परिपूर्णच झाला आहे. लिखाणात ढिसाळपणा, गळथानपणा त्यांना मान्यच नाही. संपूर्ण तयारीनिशी एखाद्या मताचे खंडन व स्वमताचे मंडन असा काहीसा वकिली खाक्या त्यांच्या लिखाणात अनेकदा डोकावतो.

© www.madhaveeraghuveer.com

परंतु लेखनाची इतकी घट्ट बांधणी असल्यामुळेच तिथे शंकेला, संशयाला स्थानच नाही. वाचक संपूर्णपणे प्रभावित होऊन जातो.

अध्यात्म, योग, कर्ममार्ग, धर्म, माया, प्रकृति असे शब्द आपल्या वाचनात, ऐकण्यात वारंवार येतात. परंतु त्यांचा नेमका अर्थ आपल्याला माहिती नसतो. लोकमान्यांनी त्यांच्या तेजस्वी लेखणीने या सर्व शब्दांना एक निराळेच परिमाण प्राप्त करून दिले आहे. १०० वर्षांपूर्वीचा काळ लक्षात घेतला तर त्या काळानुसार कित्येकदा पल्लेदार वाक्यांची रचना पुष्कळदा आढळते. परिणामतः केवळ एकदा वाचून तो अर्थ समजतोच असे नाही. कित्येकदा एक एक वाक्य पुन्हा पुन्हा वाचावे लागते. तेव्हा कुठे त्यांचा खरा अर्थ ध्यानात येतो, व अंतःकरणात ठसतो. त्यांनी कर्ममार्गाला प्राधान्य दिले असले तरी भक्तिमार्गाचे महत्त्व कुठेही अमान्य केलेले नाही. १३ वे प्रकरण तर केवळ भक्तिमार्गासाठीच आहे. परमेश्वर सर्वत्र कसा भरून राहिला आहे हे त्यांनी साधकांच्या मनावर परिणामकारकरीत्या ठसवले आहे.

• हिमालयापासून ते धुळीच्या क्षुद्र कणामध्येही तो परमेश्वर आहेच. तो जसा सर्पात आहे तसाच गरुडातही आहे. सिंहात असणारा परमेश्वर सशातही आहे. विघ्नकर्ता तोच व विघ्नहर्ता सुद्धा तोच आहे. घोर आणि अघोर, शिव आणि अशिव या सर्वांमध्ये तोच आहे हे सांगताना त्यांच्या मनाचा हळुवार कोपरा उलगडून जातो.

(५) गीतेतील अध्यात्म, धर्म, कर्मयोग, भक्तिमार्ग, विश्वाची उभारणी व संहारणी या सर्वांचा आढावा घेऊन पुन्हा ते गीतेच्या बाह्यरंगाकडे वळतात. भगवद्गीता ही महाभारतात कुठे व कशी आली आहे? ब्रह्मसूत्रे, उपनिषद व गीता यातील साम्यस्थळे कोणती या सर्वांचा अभ्यास लोकमान्यांनी फार बारकाईने केला आहे. भागवतधर्माबरोबरच बौद्ध ग्रंथ, बायबल यांचाही अभ्यास केला आहे. आणि हे सर्व करत असताना गीतेतील प्रत्येक श्लोकाचा अर्थ शब्दशः उलगडून सांगताना संस्कृत व्याकरणाचा त्यांचा गाढा व्यासंग पदोपदी जाणवतो. एकेका पदाचे दोन किंवा तीन अर्थ लावताना त्यांचे शब्दभांडार ते अक्षरशः उघडे करतात. भाषाप्रभुत्व म्हणजे काय ते यातून

ठळकपणाने समोर येते.

एका व्यक्तीने आपल्या एका आयुष्यात जीवनाच्या किती विविध अंगांना स्पर्श करावा याची आपण कल्पना जरी केली तरी आपण थक्क होऊन जातो. गणित, तत्त्वज्ञान यासारख्या विषयांचा सखोल अभ्यास, वकिली पद्धतीने विषयाची मुद्देसूद मांडणी, ब्रह्मसूत्र उपनिषदे यासारख्या धर्मग्रंथातील ज्ञान, शिवाय इतर धर्मग्रंथ - बायबल, बौद्ध ग्रंथ यांचा अभ्यास, त्यातील वचने, हॉब्ज व हेल्वेशियस यांच्यासारख्या पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांचे विचार, त्या जोडीला संस्कृत वाङ्मय व व्याकरण - हा सर्व अभ्यास त्यांनी कधी व कसा केला असेल हे कोडेच आहे, आणि नुसताच अभ्यास नव्हे तर त्यावर प्रभुत्व मिळवले आणि हे सर्व एकमार्गी घडत होते असे नाही. तर केसरी मराठा सारखी जळजळीत दैनिकांचे संपादन, राष्ट्रोद्धाराची तळमळ आणि धगधगता असंतोष उरात घेऊन केलेली जनजागरणाची चळवळ! एक ना दोन! ही यादी स्वल्पातच संपणारी नाही.

आपल्या सीमित बुद्धीने त्या असीम व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करणे कठीणच आहे. या सुवर्णाप्रमाणे झळझळीत अशा चरित्रावर ठळकपणे शोभून दिसणारे सुवर्णपदक म्हणजे हा त्यांचा अद्भुत ग्रंथ - 'गीतारहस्य'! या ग्रंथाने शंभरीत पदार्पण केले आहे. या ग्रंथाच्या शताब्दीच्या निमित्ताने लोकमान्यांना त्रिवार वंदन!

माधवी रघुवीर जोशी
डी - ९५, वुडलँड
गांधीभवनजवळ
कोथरूड पुणे-४११०३८
फोन नं. २५३८६९६४

© www.madhaveeraghuveer.com